**AGPE THE ROYAL GONDWANA RESEARCH JOURNAL**
**OF HISTORY, SCIENCE, ECONOMIC, POLITICAL AND SOCIAL SCIENCE**
**ISSN (E): 2583-1348 | A Peer reviewed | An Open Access & Indexed**
**Volume 07 | Issue 04 | April 2026 | *www.agpegondwanajournal.co.in* | Page No. 52-58**

# मराठी भाषेचे संवर्धन: काळाची गरज

***अपर्णा फाळके-कटरे***
***प्राध्यापक, भवभूति महाविद्यालय, आमगांव. जि. गोंदिया***

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## प्रस्तावना

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. त्या-त्या प्रदेशाची एक भाषा असते, तशी मराठी ही महाराष्ट्राची भाषा आहे. मराठी भाषेचा उगम संस्कृत व प्राकृत भाषेपासून झाला असून महाराष्ट्री प्राकृत या बोलीभाषेतून ती निर्माण झाली. साधारणतः इसवीसनाच्या 500 ते 700 या काळात मराठी भाषेचे स्वतंत्र अस्तित्व मानले जाते. संस्कृत-महाराष्ट्री-प्राकृत-अपभरंश-मराठी असा तिचा प्रवास आहे.

## लिखित स्वरुपातील मराठी

मराठी जरी महाराष्ट्री जनमाणसाची बोलीभाषा असली तरी लिखित स्वरुपात ती इ.स.983 च्या सुमारास कर्नाटकातील श्रवणबेळगोळा येथे बाहुबली गोमटेश्वराच्या मूर्तीच्या पायथ्याशी सापडते. ‘श्रीचामुण्डराये करवियले, गंगराजे सुताले करविले’ असा शिलालेख तेथे सापडला आहे. रायगड जिल्हयातील अलिबाग जवळील ‘अक्षीचा शिलालेख’ हा शके 934 (इ.स.1012) प्राचीन मराठी भाषेचा, देवनागरी लिपीतला शिलालेख आहे. सातारा येथील ताम्रपट (इ.स.739) हा राष्ट्रकूट काळातील मराठी भाषेच्या प्राचीनतेचा लिखित पुरावा मानला जातो. तर पंढरपूरच्या देवळातील विविध शिलालेख हे मराठीच्या प्रारंभिक स्वरुपाची साक्ष देतात.

अलीकडे नाणेघाटचा शिलालेख मराठी भाषेतील लिखित पुरावा मानला जातो. पूणे जिल्हयातील

| CORRESPONDING AUTHOR: | RESEARCH ARTICLE |
|---|---|
| **Aparna Falke-Katre**<br>Assistant Professor,<br>Bhavabhuti College, Amgaon. Dist. Gondia, Maharashtra<br>Email: aparnakatre041@gmail.com | |
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

जुंन्नरजवळील ‘नाणेघाट’ या सुप्रसिद्ध, कोकण व दख्खनच्या पठाराला जोडणाऱ्या मार्गावर ‘ब्राम्ही’ लिपीत लिहिलेला पण मराठी भाषेत कोरलेला शिलालेख आढळतो. नाणेघाट येथील ‘जकातीचा रांजण’ हा भव्य दगडी रांजण प्राचीन काळी ‘जकात’, ‘कर’ टाकण्यासाठी वापरला जात असे.

इसवीसन 2220 वर्षापूर्वीचा शिलालेख सातवाहन राणी नागनिका हिने हा शिलालेख करवून घेतल्याचे मानले जाते.

“माझा मराठीची बोलु कवतुके
परि अमृतातेहि पैजा जिंके”

शके 1110 मध्ये मुकूंदराजांनी ‘विवेकसिंधु’ लिहिला. हा मराठीतील आद्य ग्रंथ मानला जातो. 13 व्या शतकात म्हाइंभटांनी लिहिलेला (इ.स.1278)‘लीळाचरित्र’ हा ग्रंथ ‘आद्यचरित्रग्रंथ’ तसेच गद्यग्रंथ मानला जातो.

महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी मराठी भाषेला धर्मभाषा करुन 13 व्या शतकात विपूल गद्य, पद्य साहित्य निर्माण करुन मराठी भाषेचे संवर्धन करतात. संस्कृत भाषेला ज्ञानभाषा माणण्याच्या काळात श्रीचक्रधरस्वामींनी सामान्य जनांची मराठी भाषा (प्राकृत/मराठी) उपदेशाचे माध्यम म्हणून वापरली.

**केसोबास आणि नागदेवाचार्य**

दोन महानुभावांचा संवाद प्रसिध्द आहे.

“तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा
मज चक्रधरे निरुपिली मऱ्हाटी”

स्मृति-संकलनात्मक गद्य चरित्रवाङमय ही महानुभावांची मराठी भाषेला मोठी देणगी आहे. उदा. लीळाचरित्र ‘सांकेतिक लिपी’ (सूत्रपाठ, दृष्टांतपाठ). महानुभाव साहित्य जतन करण्यासाठी वापरली गेलेली ‘सांकेतिक लिपी’ही मराठी भाषेला ‘मोलाची देण’आहे.

संत ज्ञानेश्वरांनी तर ‘भावार्थदिपिके’ च्या रुपाने मराठी जनांशी ‘गूज’ साधले आहे. वारकरी संप्रदायातील संतांच्या मांदियाळीने तर, मग स्त्री-पुरुष आणि जातीभेदांच्या पलिकडे जाऊन जी संतसाहित्याची निर्मिती केली त्याने तर “अवघा रंग एक झाला”.

पंडिती वळणाची ‘अलंकृत’ मराठी, शाहिरी लावणी-पोवाड्यांचा ‘दिमाख’ दाखवित मायमराठी पुढे-पुढे जात राहिली. शिवकाळात तर ती ‘मोडी’ लिपित आज्ञापत्रात समाविष्ट झाली. अनेक बोली-भाषांतले ‘शब्द’ घेत मराठीचा प्रवाह अखंडपणे चालला होता. मराठी उत्तरोत्तर समृद्ध, श्रीमंत होत होती.

महाराष्ट्राच्या जनमाणसाचा सुखदुःखाचा ‘हुंकार’ होऊन बसली.

पुढे अर्वाचीन स्वरुपात मराठी सतत बोलली जात होती, लिहिली जात होती. मराठी भाषा ही इंडो-युरोपियन भाषाकुलातील एक भाषा आहे. मराठी भाषा ही भारताच्या 22 भाषांपैकी अधिकृत भाषा आहे. तर गोवा राज्याची ती सहअधिकृत भाषा आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची संख्या सुमारे 14 कोटी मानली जाते. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील 10 वी तर भारतातील तिसरी भाषा मानली जाते.

**विविध बोलींनी समृध्द मराठी**

महाराष्ट्रात मराठी भाषा बोलली जात असली तरी नेमकी कोणती मराठी बोलली जाते? तर महाराष्ट्राचा क्षेत्रफळ विस्तार पाहता, झाडीबोली, वऱ्हाडी, नागपुरी, अहिराणी, मराठवाडी, पुणेरी, सातारी, कोल्हापुरी, सोलापुरी, कोकणी आणि अजुनही अनेक बोली; तर हे झाले प्रादेशिकतेनुसार शिवाय विविध जातींच्या, विविध ‘जातबोली’ असतात.

साधारणतः उत्तरेकडील सतपुडा पर्वतरांगाच्या पासून कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत, उत्तरेस दमणपासून दक्षिणेस गोव्यापर्यंत मराठी भाषा बोलली जाते. दर बारा कोसावर बोली बदलत जाते असे जुने जाणते सांगतातच. व्यक्तिपरत्वे, वयपरत्वे, परिस्थितीपरत्वे, काळापरत्वे सुध्दा भाषा बदलत जाते. ज्याप्रमाणे एखादया मोठया नदीला जसे छोटे छोटे जलप्रवाह, ओढे, नाले येऊन मिळतात. येताना आपापले गुणधर्म घेऊन येतात. तेव्हा मग मोठी नदी तयार होते. हे छोटे-छोटे प्रवाह ला नदीला आकाराने, गुणधर्माने समृद्ध करतात तसेच बोलीचे विविध प्रवाह येऊन भाषा तयार होते. महाराष्ट्रातल्या विविध बोलींनी मिळून मराठीरुपी नदी समृद्ध, विशाल केली आहे. भाषा ही एक जैविक प्रक्रिया आहे. प्रत्येक व्यक्तिपरत्वे ती वेगळी आहे.

**बोली आणि भाषा**

बोली आणि भाषा यांत फरकत आहे .‘बोली’ या विशिष्ट समुदाय, जात यापूरतीच मर्यादित असतात, तर भाषा ही सार्वत्रिक असते. मराठीत साधारणपणे 60 ते 70 बोली आहेत. उदा. गोंडी बोली - ही फक्त एखादया जातीपुरतीच असते. ती विशिष्ट जात बोली होय.

एखादी विशिष्ट जातबोली, समुदायबोली ही सर्वच लोकांना कळणार नाही किंवा बोलताही येणार नाही. त्यासाठी प्रमाणभाषा ही आवश्यक असते. कार्यालयीन कामकाज, प्रशासकिय व्यवहार, न्यायालयीन

कामकाज, शालेय, महाविद्यालयीन स्तरावर प्रमाणभाषा असणे/वापरणे आवश्यक आहे. पण म्हणून बोलीचे महत्व, योगदान नाकारता येत नाही.

**भाषिक देवाण-घेवाण**

शिवकाळात मराठी भाषेवर साधारणतः अरबी-फारसीचा पगडा होता. कारण त्यापुर्वी आणि त्यावेळेस मुसलमानी सत्ता होत्या. ओघानेच त्यांच्या भाषेचा प्रभाव मराठीवर होता. गोव्यात पोर्तुगिज भाषेचा प्रभाव होता. भाषेची देवाण-घेवाण ही एक सहजप्रक्रीया आहे. सीमावर्ती भागात दोन भाषांची सरमिसळ सहज जाणवते. इंग्रजी राजवटीत, संपर्काने इंग्रजी शब्द आले, इंग्रजी शिक्षणही आले. राज्यकर्त्यांची, जेत्यांची भाषा ही नेहमीच सामान्य जनमाणसाला श्रेष्ठ वाटते, या न्यायाने सामान्य मराठी माणसाला इंग्रजी श्रेष्ठ वाटू लागली. इंग्रजी शिक्षण सुरु झाले. लहान-लहान मुलांना कॉन्व्हेंट मध्ये, इंग्रजी माध्यमात शिकविणे घरातही इंग्रजीयुक्त मराठी बोलणे, सगळीकडेच बहुतांश दुकाने, कार्यालये यांच्या पाट्या/फलक, (नामफलक) इंग्रजीतून असणे अशी हळूहळू बयाच मार्गांनी इंग्रजी मराठीवर वरचढ होऊ लागली. उच्च शिक्षणही, त्याची पुस्तके, अभ्यासक्रम सगळे इंग्रजीतूनच. मग स्वाभाविकच इंग्रजी बोलण्यावर, सुधारण्यावर भर दिला गेला.

**मराठीला तर आपल्याच घरात जाच होऊ लागला**.

अगदी कुटूंबातील लग्नपत्रिका, इतर कौटुंबिक कार्यक्रमाच्या पत्रिका इंग्रजीत छापल्या जाऊ लागल्या. वधू-वरांची नावे इंग्रजीत. मराठीत घरातल्या लग्नातली मराठी गाणी संपून ती हिंदी+इंग्रजी ऐकू येऊ लागली. मराठी कुटंबातले 'नाते' सांगणारे शब्दही हळूहळू संपुष्टात येऊ लागले. काका-काकी, मामा-मामी, आत्या-आतोबा, मावशी-मावसा, आजा-आजी, मेहुणा-णी, शालक-साळा आणि अनेक नातेदर्शक शब्द नामशेषच होऊ लागली.

पूर्वी इंग्रजी कठीण वाटते म्हणून इंग्रजीची ट्यूशन, शिकवणी लावली जायची. हल्ली मराठीची 'शिकवणी' लावली जाऊ लागली. मराठी भाषेत दिल्या जाणाऱ्या 'शिव्या' सुद्धा इंग्रजीतून आल्या. इथे कदाचित विनोद वाटेल पण तसे नाही. भाषा हळूहळू कशी मरत जाते याचे हे उदाहरण आहे. अगदी स्वतःची अशी जी 'स्वाक्षरी' आहे ती सुद्धा मराठीतून नकोशी वाटते. इंग्रजीतूनच केली जाते.

आज मोबाईलच्या युगात तर मराठी लेखनाची सुविधा असूनही मोबाईलवर इंग्रजीतून, रोमन लिपीतून मराठी टाईप/टंकलेखन केली जाते. मराठी शाळा बंद पडू लागल्या, ओस पडू लागल्या इंग्रजी

शाळांचा सुळसुळाट झाला. विरोध इंग्रजी किंवा दुसऱ्या कुठल्या भाषेला नाही. बहुभाषिक असणे नक्कीच चांगले परंतु मातृभाषेचा विसर पडणे बरे नव्हे. भाषा संपणे म्हणजे एका संस्कृतीचा नाश होणे. हा बदल मुंगीच्या पावलांनी, अगदी सूक्ष्म गतीने होत असतो. तो सहजासहजी लक्षातही येत नाही. हे फार भयावह आहे. प्राचीन समृद्ध वारसा असलेली एक भाषा जर संपत असेल तर त्या भाषेला वाचवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे कारण,

"भाषा मरता देशही मरतो
संस्कृतीचाही दिवा विझे"

**सांस्कृतिक राष्ट्रवाद**

यासंदर्भात 'ज्यू' लोकांचे उदाहरण दिले जाते. इस्त्रायल नावाचा देश. त्यातील लोक जगभर विखुरले होते. या सर्व गोंधळात त्यांनी आपली 'हिब्रू' भाषा जिवंत ठेवली. भाषा जिवंत ठेवण्यासाठी ती वापरावी म्हणजे बोलावी, लिहावी लागते जवळपास 2000 वर्षे 'देशहिन' असलेल्या 'ज्यूं' भाषेच्या बळावर एकत्र आले आणि आज इस्त्रायल नावाचा देश उभा आहे. 'हिब्रू' भाषेची सक्ती हे एकात्मिक राष्ट्रनिर्मितीचे (छंजपवद इनपसकपदह) चे उत्तम उदाहरण मानले जाते.

**शासनदरबारी मराठी**

प्राचीन, वैभवशाली, समृद्ध अशा मराठी भाषेची आजची परिस्थिती पाहता, शासकिय स्तरावर विविध प्रयत्न केलेले आहेत. महाराष्ट्रात सरकारी कार्यालये, न्यायालये आदिंमध्ये मराठी भाषेचा वापर सक्तीचा केला आहे.

**मराठी भाषा गौरव दिन**

27 फेब्रुवारी 2014 पासून महाराष्ट्रात 'मराठी भाषा गौरव दिन' अधिकृतपणे साजरा करणे सुरु केले आहे.

27 फेब्रुवारी 1912 हा कविवर्य कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस. कुसूमाग्रजांचे मराठी साहित्यातील योगदान महत्वाचे आहे. कविता, नाटक साहित्याच्या सर्वच क्षेत्रात त्यांनी भरभरुन दर्जेदार जे लेखन केले आणि मराठी सारस्वताला एका उंचीवर नेऊन ठेवले. त्यांचे हे मोलाचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला, यानिमित्ताने भाषाविषयक वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम राबविले जातात. जेणेकरुन मायमराठीची आठवण व्हावी, ती जिवंत रहावी, वृध्दिंगत व्हावी.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

14 जानेवारी ते 28 जानेवारी हा पंधरवडा 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा केला जातो. या पंधरा दिवसांत शाळा, महाविद्यालये, न्यायालये, वाचनालये, ग्रंथालय यातून मराठी भाषेचे संवर्धन (वाढ) होईल असे उपक्रम राबविले जातात.

काव्यवाचन, शुद्धलेखन, भाषण, निबंधलेखन, पोष्टर-भित्तीपत्रक, कथाकथन, हस्ताक्षर स्पर्धा, मराठी साहित्यिकांची ओळख, ग्रंथदिंडी, वारकरी परंपरा असे कितीतरी सुंदर उपक्रम राबविले जातात. जेणेकरुन पुढील पिढीला मराठीची ओळख 'साजऱ्या' रुपात होत जावी.

**महाराष्ट्र दिन/मराठी राजभाषा दिन**

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर 1 मे 1965 पासून 1 मे हा दिवस महाराष्ट्र दिन, कामगार दिवस यासोबतच 'मराठी राजभाषा दिन' म्हणूनही साजरा केला जातो.

**अभिजात भाषा: मराठी**

महाराष्ट्र शासनाने रंगनाथे पठारे समितीच्या अहवालानुसार हा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला. साहित्य अकादमीच्या तज्ञ व्यक्तिंकडून त्याची तपासणी झाली. त्यानंतर 3 ऑक्टोबर 2024 मध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. अभिजात भाषेचा दर्जा मिळविणे म्हणजे "समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटविणे होय."

**अभिजात भाषेचे निकष**

1. ती भाषा स्वयंभू असावी. तिचा जन्म अन्य कोणत्याही भाषेतून झालेला नसावा.
2. त्या भाषेचे वय 1500 ते 2500 वर्षे असावे.
3. ती भाषा प्राचीन व त्यातील साहित्य श्रेष्ठ दर्जाचे असावे.
4. प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रुप यांच्यात गाभा कायम असावा.

या सर्व निकषांवर मराठी भाषा खरी उतरली आणि "अभिजात भाषेची" शासकिय मोहोर उमटली तब्बल एका तपाचा प्रवास करुन मराठीला अभिजात पण लागले.

**फायदे**

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, संशोधनासाठी व भाषिक संशोधनासाठी केंद्र सरकारकडून विशेष अनुदान मिळते. तसेच भाषाभवन उभारणे, प्राचीन ग्रंथाचा अनुवाद

करणे, शिवाय भाषाक्षेत्रात कार्य करणाऱ्या विद्वानांसाठी 2 पुरस्कारही आहेत.

**मराठी भाषा टिकविण्यासाठी उपाय**

1. दैनंदिन व्यवहारात मराठी बोलणे.
2. किमान स्वतःची स्वाक्षरी मराठीत करणे.
3. नावांच्या पाटया मराठीतच लिहिणे
4. विवाह किंवा इतर कुठल्याही कौटुंबिक, सार्वजनिक कार्यक्रमाची पत्रिका मराठीत लिहिणे.
5. नात्यांना मराठीतील संबोधने वापरणे.
6. शाळांमधून मराठी हा विषय सक्तीचा करणे.
7. दोन मराठी माणसे भेटली तर संवाद मराठीतच करणे.
8. मोबाईल वापरण्याच्या काळात मराठीतून देवनागरी लिपीचा वापर करुन लिहिणे.

**समारोप**

अशा आणि यासारख्या अनेक लहान सहान गोष्टी जरी केल्या तरी भाषा टिकून राहण्यास, तिचे संवर्धन होण्यास आणि तिची समृद्धी होण्यास मदत होईल आणि एक प्राचीन, स्वयंभू, रसाळ मराठी भाषा दिवसेंदिवस वृद्धिंगत होण्यास, तिच्यात साहित्यनिर्मिती होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची**


1. वसंत जोशी - संपा. भाषा व साहित्य संशोधन
2. मराठी विश्वकोष - खंड 11
3. प्राचीन मराठी वाङमयाचे स्वरुप, ह. श्री. शेणोलीकर
4. मराठी वाङमयाचा इतिहास, खंड-2, पांगारकर
5. प्रदक्षिणा खंड-1
6. नाणेघाट शिलालेख - संदर्भ - डॉ. शोभना गोखले जेष्ठ पुरातत्व अभ्यासक (संदर्भ -ई-सकाळ)
7. ज्ञानेश्वरी अध्याय सहावा
8. 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष, डॉ. तारा भवाळकर.
9. कुसुमाग्रज


■ ■ ■